# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मानवत

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0273 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/06/2024 18:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 05/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/06/2024
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/06/2024 **Time (वेळ):** 17:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/06/2024 17:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालय, पोहंडुळ, पोहंडुळ,मानवत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** वशिष्ठ रावसाहेब धोपटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोहंडूळ ,पोहंडूळ,मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोहंडूळ ,पोहंडूळ,मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9518768702

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मधुकर बाबुराव गोरे | | | 1. विश्वकर्मा मंदिराजवळ,मातोश्री नगर, कारेगांव रोड ,परभणी, परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 20 नोटा | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी वशिष्ठ रावसाहेब धोपटे वय 42 वर्षे धंदा ठेकेदार रा पोहंडूळ ता मानवत जि परभणी मोनं.9518768702 समक्ष पोस्टे मानवत येथे फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणार असुन ठेकेदारी करुन आपल्या कुंटुबाची उपजिवीका भागवितो.

दि 13/05/24 रोजी मी एसीबी, परभणी येथील पो.उप.अधी. इप्पर साहेब यांना माझी एका लोकसेवकाविरुध्द तक्रार आहे असे फोनवर कळविल्याने त्यांनी व्हॉट्सअॅप वर प्रलंबित कामाची कागदपत्रे मागवुन घेतली व त्यांची लाच मागणीची खात्री झाल्यानंतर त्यांनी मानवत येथे येवुन मला फोन करुन मानवत येथे बोलावुन घेतले. तेथे एसीबी, परभणी येथील पोनि वाघमारे साहेब यांनी त्यांची ओळख सांगुन रा.प.म परभणी येथील शासकीय पंच नामे 1) ज्ञानेश्वर देविदासराव पांचाळ, वाहक बॅनं14966 व2) राजकुमार शिवराम दामले, वाहक बॅनं 8464, तसेच सापळा पथकातील अंमलदारांची ओळख करून दिली.

त्यानंतर मी त्यांना माझी टाईप केलेली तक्रार दिली की, माझा मित्र अशोक भानुदास पाटील रा. पोहंडूळ हा ठेकेदारकी करतो. अशोक पाटील याने आमचे ग्रामपंचायत पोहंडूळ येथील DPDC अंतर्गत सिसि रोड व नाले बांधकामाचे काम मंत्रालयातुन पाठपुरावा करुन कामाची मंजुरी आणली आहे. माझा मित्र अशोक पाटील याने सिसीरोड व नाले बांधकामाचे काम मला करण्यास दिले. ते काम दहा लाख रुपयाचे होते, ते काम मी पुर्ण केले आहे. मी केलेल्या कामाचे 5,64,000/- रू बिलाचा चेक देण्यासाठी मला ग्रामपंचायत पोहंडुळचे ग्रामसेवक गोरे साहेब यांनी 20,000/- रू लाचेची मागणी केली होती. तेंव्हा मी त्यांना म्हणालो आता माझे कडे 20,000/- रु नाहीत. या कामाचे उर्वरित बिलाच्या रकमेचा चेक घेऊन जातांना मी तुम्हाला 20,000/- रू देतो.

दि. 06/05/24 रोजी मी सिसिरोड व नाले बांधकामाचे काम केलेल्या उर्वरित बिलाच्या रक्कमेचा चेक मागण्यासाठी त्यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी मला पंचायत समिती मानवत इथे येऊन उर्वरित रक्कमेचा चेक घेऊन जाण्यास सांगितले. मी पंचायत समिती मानवत येथे उर्वरित बिलाच्या रक्कमेचा चेक घेण्यासाठी गेलो असता त्यांनी मला चेक देऊन 20,000/- रू लाचेची मागणी केली. त्यावेळी मी नाईलाजास्तव ग्रामसेवक गोरे यांना 4,000/- रू दिले. तसेच उर्वरित लाचेची रक्कम मी RTGS च्या फॉमवर सही घेण्यासाठी येईल तेंव्हा देतो असे म्हणुन त्यांना वेळ मागुन घेतला आहे. मी ग्रामपंचायत पोहंडूळ येथील DPDC अंतर्गत सिसिरोड व नाले बांधकाम केलेल्या कामाचे बिलाचा चेक माझ्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी आवष्यक असलेल्या RTGS च्या फॉमवर ग्रामसेवक व सरपंचाची सही घेण्यासाठी पैसे लागत नाहीत. जर मी ग्रामसेवक गोरे यांना पैसे दिले नाहीत तर चेक बँक खात्यावर जमा करण्यासाठी आवश्यक असलेल्या DTDC च्या फॉमवर ते सही करुन देणार नाहीत. त्यामुळे मी केलेल्या कामाचे मला पैसे मिळणार नाहीत या भितीपोटी मी नाईलाजास्तव माझी इच्छा नसतांना ग्रामसेवक गोरे यांना लाच देण्यासाठी होकार दिला आहे.

ग्रामसेवक गोरे यांच्याशी माझे भांडण किंवा वाद नाही. त्यांचा माझा यापुर्वी कोणत्याही प्रकारचा देवाण घेवानीचा आर्थिक व्यवहार नाही. RTGSफॉमवर सही घेण्यासाठी मी व माझा मित्र अशोक पाटील असे ग्रामसेवक गोरे यांचेकडे आज दि. 13/05/24 रोजी जाऊन भेटणार आहोत. त्यादरम्यान ग्रामसेवक गोरे यांनी किंवा त्यांचे वतीने इतर कोणत्याही इसमाने मला RTGS फॉमवर सहीसाठी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती.

मी दिलेल्या तक्रारीवर पोनि वाघमारे एसीबी, परभणी व वरील पंचांनी माझी तक्रार वाचून त्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोनि वाघमारे साहेब यांचे सुचनेवरुन पोशि/ नागरगोजे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवुन DVRमध्ये एक नवीन कोरे मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये आमचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर लोकसेवक गोरे हे मला ज्या ठिकाणी भेटण्यास बोलवतील त्या ठिकाणी जावुन त्यांची भेट घेवुन त्यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्याकरीता मी गोरे यांना फोन केला. त्यावेळी मी त्यांना मानवत शहरातील आई हॉटेल येथे भेटण्यासाठी बोलावले. त्यावेळी त्यांनी होकार दिला. त्यानंतर पोनि वाघमारे साहेब यांचे

सुचनेवरुन पोशि/ नागरगोजे यांनी DVRचालु करुन माझ्या शर्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेऊन दिले. पंच क्र.01 पांचाळ व माझा मित्र अशोक पाटील व मी असे माझी मोसा क्र MH22AZ2780 ने गोरे यांची भेट घेवुन पडताळणी करण्यासाठी रवाना झालो.

पडताळणी कार्यवाहीत पंचासमक्ष गोरे यांनी माझेकडुन यापुर्वी 4,000/- रू लाच रक्कम स्विकारली असल्याचे मान्य केले. त्यानंतर ग्रामसेवक व सरपंच यांची सही व शिक्का असलेले दोन कोरे RTGS फॉर्म दिले. त्यानंतर चर्चेदरम्यान माझे कामासाठीचे उर्वरित 10,000/- रु लाचेची मागणी करुन लगेच स्विकारण्याची संमती दिली. सापळा पुर्व व सापळा कार्यवाहीत मी पंचासमक्ष गोरे यांनी मागणी केलेली लाच रक्कम 10,000/- रू हजर केले. सदर रक्कमेच्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यानंतर पोशि/शेख यांनी अॅंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर मी जमा केलेल्या लाच रक्कमेस अॅंथ्रासिन पावडर लावुन ती माझ्या अंगावरील पॅटच्या डाव्या बाजुच्या खिशात अलगद ठेवुन दिली. त्यानंतर पोशि/नागरगोजे यांनी DVR चालु करुन देवुन मला पंच क्र 1 पांचाळ यांचेसोबत माझ्याजवळील मोटारसायकलने मानवत शहरातील पंचायत समिती येथे गोरे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. आमच्या पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. मी पंचायत समिती मानवत येथून गोरे यांना फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, ते गावाला निघाले आहेत व काही आणले असतील ते अशोक जवळ दया त्याचे कडून मी नंतर घेतो असे म्हणाले, त्यावर मी त्यांना तो खर्चुन टाकील असे म्हणालो. गोरे म्हणाले नाही खरचत दया तेच्याकडे असे म्हणाले, परंतु मी अशोक जवळ पैसे दिले नाहीत. सापळा कार्यवाहीत गोरे यांची भेट न झाल्याने आजची कार्यवाही स्थगित करुन दि 14/05/24 रोजी करण्याची विनंती केली. त्यावरुन दि 13/05/24 रोजीचे कार्यवाहीतील DVR व अॅंथ्रासिन पावडरयुक्त 10,000/- रू लाच रक्कम तात्पुरत्या स्वरुपात स्वतंत्र वेगवेगळया कागदी पाकीटात सिलबंद करुन ठेवण्यात आले.

दि 14/05/24 रोजी मा. पो.उप.अधी. इप्पर साहेब यांना मी फोनव्दारे सांगितले की, गोरे यांचा माझा मित्र अशोक यास आज रोजी फोन आला होता. गोरे यांनी अशोक यास लाच रक्कम घेण्याबाबत सांगितले आहे. परंतु मला दोन दिवस माझी वैयक्तिक अडचण असल्यामुळे मी मा. इप्पर साहेब यांना फोनव्दारे विनंती केली की, गोरे यांच्यावर दि. 17/05/24 रोजी सापळा कार्यवाही आयोजित करावी. त्यानंतर दि 17/05/24 रोजी मी मा. पो.उप.अधी. इप्पर साहेब यांना फोनव्दारे सांगितले की, मी व माझा मित्र अशोक असे गोरे यांचे विषयी माहिती घेण्यासाठी मानवत येथे गेलो असता गोरे हे कोठे आहेत याची माहिती मिळाली नाही त्यासाठी आजची कार्यवाही स्थगित करुन ती दि 20/05/24 रोजी आयोजित करण्याची विनंती केली. दि 20/05/24 रोजी मी व माझा मित्र अशोक असे गोरे यांचे विषयी माहिती घेतली असता आम्हाल कळाले की गोरे हे त्यांचे सहकारी प्रशिक्षण दौ-याकामी कोकणात गेले आहेत. त्यामुळे मी मा. पो.उप.अधी. इप्पर साहेब यांना व पोनि वाघमारे साहेब यांना फोनव्दारे सांगितले की, आज रोजीची सापळा कार्यवाही स्थगित करुन गोरे हे त्यांचे सहकारी प्रशिक्षण दौ-यावरुन ज्या दिवशी परत येतील त्या दिवशी गोरे यांचेवर सापळा कार्यवाही आयोजित करावी. त्यानंतर दि. 28/05/24 रोजी मला पोनि वाघमारे साहेब यांनी गोरे यांच्या विषयी विचारपुस केली त्यावेळी मी त्यांना सांगितले की, दि 29/05/24 बुधवार रोजी गोरे हे आमच्या गावातील ग्रामपंचायत कार्यालयात येणार आहेत, तुम्ही मानवत येथे या. त्यावरुन दि. 29/05/24 रोजी पोनि वाघमारे साहेब हे सापळा पथकासह मानवत येथे आले. मला सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येण्यास सांगितले. मी व माझा मित्र अशोक पाटील सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी गेलो. त्यावेळी पोनि वाघमारे साहेब यांना सांगितले की, आमच्या गावातील एक वयोवृध्द महिला मरण पावली आहे. त्यामुळे गावात अंत्यविधीचा कार्यक्रम होता म्हणुन ग्रामसेवक गोरे हे आमच्या गावात आल्याचे दिसले नाहीत. त्यामुळे मी व माझा मित्र अशोक असे मानवत येथे येऊन ग्रामसेवक गोरे यांचे विषयी माहिती घेतली असता तेथील लोकांनी सांगितले की गोरे हे आज कार्यालयात आलेले नाहीत. म्हणुन मी सापळा पथकास विनंती केली की, आज रोजीची सापळा कार्यवाही स्थगित करुन पुढच्या बुधवारी म्हणजे दि 05/06/24 रोजी आमच्या पोहंडुळ गावातील ग्रामपंचायत कार्यालयात गोरे यांचेवर सापळा कार्यवाही आयोजित करावी.

आज दि. 05/06/24 रोजी माझ्या विनंती प्रमाणे पोनि वाघमारे हे सापळा पथकासह पोंहडुळ गावाच्या शिवाराच्या आडोशाच्या ठिकाणी येवुन मला तेथे बोलावुन घेतले. त्याठिकाणी मला सांगितले कि, सापळा कार्यवाहीतील पंच क्र 2 दामले यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांचे ऐवजी माधव सोपानराव घाटुळ वय 45 वर्ष वाहक बॅच नं 22960 रापम परभणी यांना पंच क्र 2 म्हणुन घेण्यात आले आहे असे सांगुन आमची ओळख करुन दिली. त्यानंतर पंच क्र 2 घाटुळ म्हणुन आजपर्यंत झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. त्यानंतर दि 13/05/24 रोजी तात्पुरत्या स्वरुपात सिलबंद केलेले DVR व अॅंथ्रासिन पावडरयुक्त 10,000/- रू लाच ठेवलेले पाकीट बाहेर काढले. मी व पंचानी सदर पाकीट सिलबंद असल्याची खात्री केली. त्यानंतर ASI/निलपत्रेवार यांनी सदर पाकीटाचे

सिल काढुन सोनी कंपनीचे DVR दाखवुन त्याबाबत पुर्वी प्रमाणे माहिती दिली. त्यानंतर सांगितले की, सदर DVRमध्ये दि 13/05/24 रोजी वापरण्यात आलेले मेमरी कार्डमधील फोल्डर मध्ये आज दि 05/06/24 रोजी एक नवीन फाईल तयार होईल त्या फाईल मध्ये सापळा कार्यवाहीतील माझे व गोरे यांच्या भेटी दरम्यान होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत होईल. तसेच मी जमा केलेल्या लाच रक्कमेस यापुर्वी अॅन्थ्रॉसिन पावडर लावलले आहे. ती रक्कम सापळा कार्यवाहीत गोरे यांना द्यावयाची आहे. असे सांगुन पोशि/कदम यांनी दोन्ही पंच व मला अॅथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर लाच रक्कम माझे पॅन्टच्या डावे खिश्यात ठेवुन दिली. ASI/निलपत्रेवार यांनी माझेकडे DVR चालु करून दिले. त्यानंतर मी व पंच क्र 1 पांचाळ असे वेगवेगळया मोटार सायकलने पोंहडुळ ग्रामपंचायत कार्यालयात गेलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक आले. थोडयावेळाने गोरे हे ग्रामपंचायत कार्यालयात आले. त्यावेळी पंच क्रं 1 पांचाळ हे कार्यालयाच्या खिडकीजवळ थांबले. मी ग्रामपंचायत कार्यालयात गेलो, त्यावेळी माझी व गोरे यांची माझ्या कामाबाबत चर्चा झाली. त्यादरम्यान मी माझे जवळील 10,000/- रु लाच रक्कम गोरे यांना दिली. त्यावेळी ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारली. मी त्यांना मोजुन घेण्यास सांगितले त्यावेळी त्यांनी लाच रक्कम मोजुन घेतली. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल असा पुर्वनियोजित हातास रुमाल गुंडाळुन इशारा करताच सापळा पथकाने लोकसेवक यांना जागीच लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले आहे. त्यानंतर सापळा पथकाने ग्रामपंचायत कार्यालयाची पाहणी केली. पुढील कार्यवाहीसाठी लोकसेवक गोरे यांना पोलीस ठाणे मानवत येथे घेवुन आले आहेत.
दि 13/05/24 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीत मी केलेल्या कामाचा चेक माझ्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी आवश्यक असलेल्या RTGS फॉमवर सही व शिक्का देण्यासाठी मला लोकसेवक गोरे यांनी 10,000/- रु लाचेची मागणी केली. तसेच आज दि 05/06/24 रोजी 11ः00 ते 11ः26 वाजे दरम्यान पोंहडुळ ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीत पंच क्रं. 01 पांचाळ याचे समक्ष लोकसेवक गोरे यांनी माझ्याकडुन 10,000/- रु लाच रक्कम स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी लोकसेवक मधुकर बाबुराव गोरे वय 52 वर्ष व्यवसाय ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी रा. मातोश्री नगर, कारेगांव रोड परभणी यांचे विरुद्ध कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

DIPAK LAXMAN DANTULWAR(I (Inspector)) / PCMH94137 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DIPAK LAXMAN DAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PCMH94137

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.मानवत